# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 20.01.2026** **वार- मंगळवार**

---

**<u>सायकलिंगस्पर्धा</u>**

आंतरराष्ट्रीय स्तराची 'पुणे ग्रँड टूर' या सायकलिंग मुख्य स्पर्धेच्या पहिला टप्प्यासाठी आज हिंजवडी भाग आणि आजूबाजूच्या गावाचा परिसर क्रीडामय झाला होता. हिंजवडी टी सी एस फेज थ्री पासून स्पर्धेला सुरुवात झाली. अभिनेते नाना पाटेकर, माझी लष्कर प्रमुख मनोज पांडे, पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते स्पर्धेला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. परिसरातील नागरीक तसंच शालेय विद्यार्थ्यांनी हिंजवडी मधील स्पर्धेच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. यावेळी भारतीय संघाला शुभेच्छा देणारे फलकही झळकत होते. हिंजवडी मधील भोईरवाडी या भागातील नागरिकांनी सायकल स्वरांच्या स्वागतासाठी कमानी उभारल्या होत्या.

दरम्यान, ९१ पूर्णांक ८ किलोमीटरच्या या टप्प्याचा समारोप आकुर्डीतील डी. वाय. पाटील कॉलेज इथे झाला. या टप्प्यात सर्वात आधी पोहोचलेल्या पहिल्या पाच सायकलपटूंमध्ये न्यूझीलंडचा सायकलपटू मुझवे ल्युक आणि सेंटी अमे यांचा समावेश आहे. भारतीय गटात हर्षवीर सिंह सेखोन प्रथाम तर हरियाणाचा साहिल कुमार दुसऱ्या स्थानी आला.

**पक्षीयबलाबल**

पुणे महापालिकेत १६५ जागांच्या पक्षीय बलानुसार १० स्वीकृत नगरसेवकांची निवड केली जाणार आहे. त्यात भाजपचे ७, राष्ट्रवादी काँग्रेसचे २, काँग्रेसचे १ स्वीकृत नगरसेवक असणार आहेत. त्याचप्रमाणे पक्षीय बलाबलानुसार स्थायी समिती सदस्यपदी भाजपचे १२, राष्ट्रवादी काँग्रेसचे ३ आणि काँग्रेसच्या १ नगरसेवकाची नियुक्ती होणार आहे. भाजपच्या एकहाती सत्तेमुळे ११९ पैकी ७७ नगरसेवकांची पहिल्याच वर्षी विविध समित्यांवर नियुक्ती होणार आहे.

**शिधापत्रिका**

'मिशन सुधार' अभियानाअंतर्गत दहा निकषांवर शिधापत्रिकांची पडताळणी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासाठी भूमी अभिलेख विभागाच्या 'ॲग्रिस्टॅक' बरोबरच अनेक गोष्टींचा आधार घेण्यात येणार आहे. ज्या शिधापत्रिकाधारकांकडे एक हेक्टरपेक्षा जास्त जमीन आहे आणि त्यांचं उत्पन्न प्राधान्य योजनेच्या निकषांपेक्षा जास्त आहे, त्या शिधापत्रिकाधारकांना धान्य वितरित करण्यात येणार नाही. यापूर्वी केलेल्या पडताळणीनुसार, आतापर्यंत पुणे जिल्ह्यातील ६८ हजार लाभार्थ्यांचे धान्य बंद करण्यात आले आहे.

**पंचायतराज**

पुणे जिल्हा परिषदेचे प्रशासक कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी आज पिरंगुटला भेट देऊन 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियाना' च्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. यावेळी केंद्र आणि राज्य सरकारच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान प्रभावीपणे राबवण्याच्या सूचना संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिल्या. यावेळी, "उमेद"च्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आलेल्या महिला बचत गटांना पाटील यांनी भेट देऊन त्यांच्या उत्पादनांची माहिती घेतली.

**पुणे-अभययोजना**

पुणे महापालिकेने मिळकत कर थकबाकी वसुलीसाठी सुरू केलेल्या अभय योजनेला १५ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अभय योजनेचा १ लाख १४ हजार ९२१ मिळकतधारकांनी लाभ घेतला असुन पालिकेला ७१२ कोटीचे उत्पन्न मिळाले आहे. या कालावधीत ७३ कोटी ४६ लाख २५ हजार ७४८ रूपये मिळकत कर जमा झाला आहे. मात्र, अद्यापही मोठी थकबाकी असल्यामुळे ही मुदतवाढ देण्यात आली आहे अशी माहिती आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली.

**पीएमसेतु-समारोप**

पुण्यात आयोजित 'पीएम सेतू' कार्यक्रमाचा आज समारोप झाला. शाश्वत प्रगतीसाठी तसंच प्रशिक्षकांचं कौशल्य सतत अद्ययावत ठेवण्यासाठी उद्योगांनी सहकार्य करावं, असं आवाहन केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या सचिव देबाश्री मुखर्जी यांनी याप्रसंगी बोलताना केलं. आयटीआय संस्थांचं आधुनिकीकरण केवळ पायाभूत सुविधांपुरतं मर्यादित न ठेवता, प्रशिक्षणाची गुणवत्ता आणि रोजगारक्षमता वाढवण्यावर भर देणे गरजेचं आहे असं त्या पुढे म्हणाल्या. यावेळी मुखर्जी यांनी ४० हून अधिक आघाडीच्या कंपन्यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला .

**आंतरशालेयक्रीडास्पर्धा**

महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या क्रीडावर्धिनी आणि बालशिक्षण मंदिर इंग्रजी माध्यम शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने 'मएसो क्रीडा करंडक' या राज्यस्तरीय आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आलं आहे. येत्या २३, २४ आणि २५ जानेवारी असे तीन दिवस ही स्पर्धा मयूर कॉलनी येथील बालशिक्षण मंदिर प्रशालेच्या प्रांगणात होणार आहे, अशी माहिती मएसो संस्थेच्या नियामक मंडळाच्या उपाध्यक्षा आनंदी पाटील यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. यावेळी स्पर्धेच्या 'वीर' या शुभंकरचं अनावरण करण्यात आलं.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३१ अंश, तर किमान तापमान १२ पूर्णांक ५० अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या देखील याच प्रकारचं हवामान असण्याची शक्यता हवामान विभागाने नोंदवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तान्त. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी ६ वाजता, ताज्या पुणे वृत्तान्त मध्ये, नमस्कार.**